## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

### गोपनिय विभाग

परीक्षा भवन, एल. आय. टी. परिसर, अमरावती रोड, नागपूर — ४४००३३

दुरध्वनी क्र. ०७१२—२५२३२९८, ६५६६८७५ फॅक्स क्र. ०७१२—२५४६२६३


क्र. गोप. / ८५ दिनांक:—३१/०१/२०१७

प्रति,

प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
तसेच विद्यापीठाचे पदव्युत्तर विभाग.

विषय:— उन्हाळी २०१७ च्या प्रात्यक्षिक परीक्षा तसेच सेशनल गुणांबाबत.

महोदय/ महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, उन्हाळी — २०१७ च्या प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आपल्या महाविद्यालयात आयोजित करावयाच्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. पदवी परीक्षा | अ) प्रथम व तृतीय वर्ष | दिनांक १०/०२/२०१७ ते २४/०२/२०१७ |
| | ब) द्वितीय व ईतर | दिनांक २५/०२/२०१७ ते १४/०३/२०१७ |
| २. पदवी, पदव्युत्तर सत्रपध्दती परीक्षा | | |
| | अ) सर्व परीक्षा | दिनांक १५/०३/२०१७ ते ०५/०४/२०१७ |

आपल्या महाविद्यालयात वर नमुद वर्गाची प्रात्यक्षिक परीक्षा उपरोक्त कालावधीत कोणत्या तारखेस आयोजित करावयाची तारीख तसेच अंतर्गत परीक्षकांची नावे दिनांक ०८/०२/२०१७ पर्यंत गोपनीय विभागास विशेष दुतामार्फत कळवुन त्यांची पोच घ्यावी.

तसेच सर्व परीक्षेचे सेशनल गुण पत्रके हे लेखी परीक्षा सुरू होण्याच्या ०७ दिवस आधी ऑनलाईन **college.rtmnuresults.org** या संकेत स्थळावर विद्यार्थ्यांचे क्रमांकासहित पाठवुन किंवा विद्यार्थ्यांचे परिक्षा क्रमांक (Roll No.) प्राप्त होताच ३ दिवसांचे आंत त्याची हार्ड कॉपी गोपनीय विभागास सादर करून त्याची पोच घ्यावी. ठराविक वेळेनंतर आलेले सेशनल गुण परीपत्रक क्रमांक १२५२ दिनांक ०८/११/२०१६ नुसार प्रती दिन रू १०००/— प्रमाणे दंड आकारण्यात येईल. तसेच ज्या महाविद्यालयात एकही विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक नाही, अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण महाविद्यालयाच्या (संस्थेच्या) अध्यक्ष किंवा सचिव यांना प्रदान करता येणार नाही. ज्या महाविद्यालयामध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक नसलेल्या महाविद्यालयांनी अध्यक्ष किंवा सचिवांच्या स्वाक्षरीने अंतर्गत गुण विद्यापीठाकडे सादर करू नयेत.

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयात संबंधित वर्गाची प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यावर, परिक्षा क्रमांकासहित त्याचे गुणपत्रक ऑनलाईन **college.rtmnuresults.org** या संकेत स्थळावर पाठवुन त्याची हार्ड कॉपी अंतर्गत व बाहय परीक्षकांच्या स्वाक्षरीनिशी मोहरबंद लिफाफ्यात पुढील २४ तासाच्या आत गोपनीय विभागास विशेष दुतामार्फत त्यावर परीक्षेचे नांव, वर्ष, वर्ग, प्रात्यक्षिक परीक्षेचा विषय इत्यादी नमुद करून सादर करावे, अन्यथा प्रात्यक्षिक परीक्षांच्या गुणांचे मोहरबंद लिफाफे स्वीकारल्या जाणार नाही.

कृपया वरील बाबींची नोंद घेवून योग्य कार्यवाही करावी.

आपला

(डॉ. निरज खटी)
परीक्षा नियंत्रक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ,नागपूर